# प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४१/२०२३-२४ दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९२ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

दिनांक : २६-९-२०२५

## वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा वार रविवार दि. १४-०९-२०२५ रोजी सकाळी १०.३० वा. इंद्रधनुष्य सभागृह, तेंडूलकर गार्डनसमोर, राजेंद्रनगर, पुणे ३० येथे आयोजित करण्यात आली होती.

तथापि, सदर सभेच्या सुरुवातीस पोटनियमानुसार आवश्यक असणारा कोरम पूर्ण नसल्याने माननीय अध्यक्ष श्री. दिपक ढेलवान यांनी सदरची सभा कोरम अभावी अर्ध्या तासासाठी तहकुब करणेत येत आहे. असे जाहीर केले, सदरची सभा याचठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही. मा. सचिव यांना कार्यपत्रिकेवरील विषय घेण्याचे सांगितले त्याप्रमाणे मा. सचिव श्री. मिलिंद कुलकर्णी यांनी कार्यपत्रिकेवरील विषय घेण्यास सुरुवात केली.

| | |
|---|---|
| **विषय क्र. १** | मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे. |
| **ठराव क्र. १** | मागील सभेचा इतिवृत्तांत सचिव यांनी वाचून दाखविला व सदरचा इतिवृत्तांत कायम करण्याचे ठरले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : श्री. नारायण विचारे** **अनुमोदक : श्री. प्रविण फडणीस** |
| **विषय क्र. २** | दि. १-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या कालावधीच्या आर्थिक हिशोबपत्रकांना मंजूरी देणे. |
| **ठराव क्र. २** | दि. १-४-२०२४ ते ३१-३-२०२५ या कालावधीच्या आर्थिक हिशोबपत्रकांबाबत साधक-बाधक चर्चा करुन सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : श्री. दिनेश पाटील** **अनुमोदक : श्री. किरण देशपांडे** |
| **विषय क्र. ३** | दि. ३१-३-२०२४ अखेरच्या लेखापरिक्षणाचा अहवालाची नोंद घेणे. |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३ | दि. ३१-३-२०२५ अखेरच्या लेखापरिक्षणाचा अहवाल उपस्थित सभासदांनी निरीक्षण करुन त्याबाबत साधकबाधक चर्चा करुन नोंद घेण्यात आली व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : सौ. मनिषा महाबळेश्वरकर अनुमोदक : श्रीमती. लता पाटणकर** |
| **विषय क्र. ४** | दि. १-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या कालवधीकरिता लेखापरिक्षकांची नेमणूक करणे. |
| **ठराव क्र. ४** | दि. १-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या कालवधीकरिता लेखापरिक्षकांची नेमणूक करणेबाबत चर्चेअंती मा. सहकार खात्यातील ऑडीर पॅनेलवरील पुणे शहर-२ यांच्या पॅनेलवरील श्री. बाळासाहेब मुळक यांची वरील कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी व त्यांना या कामाचा मेहताना नियमानुसार अदा करण्यात यावे असे ठरले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : श्री. कार्तिक वकील अनुमोदक : श्री. संदिप इनामदार** |
| **विषय क्र. ५** | दोषदुरुस्ती अहवालास मंजूरी देणे. |
| **ठराव क्र. ५** | दोषदुरुस्ती अहवालाबाबत सखोल माहिती सचिव यांनी माहिती देवून समजून सांगण्यात आले व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : श्रीमती. लता पाटणकर अनुमोदक : श्री. प्रविण फडणीस** |
| **विषय क्र. ६** | संस्थेच्या पॅन नंबर वरील थकित आयकर रक्कम रुपये ८९,८१४/- भरलेबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेत निदर्शनास आणणेबाबत. |
| **ठराव क्र. ६** | संस्थेच्या पॅन नंबर वरील थकित आयकर रक्कम रुपये ८९,८१४/- भरलेबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेमधील उपस्थित सर्व सभासदांच्या निदर्शनास आणण्यात आले.<br>**ठराव सर्वानुमते मान्य**<br>**सूचक : श्री.ए.ए. जमदाडे अनुमोदक : श्री. शेखर केंदळे** |

# प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

पीएनए/पीएनए(२)/एचएसजी/(टिसी)/२५९४१/२०२३-२४ दिनांक ३१/०७/२०२३
अंतिम भुखंड क्रमांक ९९२ सब प्लॉट ३० भाग, राजेंद्र नगर, नवी पेठ, पुणे ४११०३०.

| | |
|---|---|
| **विषय क्र. ७** | संस्थेच्या कायम मालमत्तेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे. |
| **ठराव क्र. ७** | संस्थेच्या कायम मालमत्ता संस्थेचा पुर्नविकास प्रकल्प चालू असल्यामुळे संस्थेची काही मालमत्तेची या प्रक्रियेमुळे पुर्णपणे नुकसान झाले आहे. तरी त्या मालमत्तेची किंमत पुढील वर्षाच्या ताळेबंदातून कमी करण्यासाठी सभेस उपस्थित असलेल्या सभासदांनी या ठरावान्वये चर्चा करुन सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.<br>ठराव सर्वानुमते मान्य<br>सूचक : श्री. चंद्रशेखर केंदळे अनुमोदक : श्रीमती. सविता नाईक |
| **विषय क्र. ८** | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचारी करणे. |
| **ठराव क्र. ८** | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी कुठल्याही विषय न आल्यामुळे मा. अध्यक्षांनी सदरची सभा संपल्याचे जाहिर केले. |

प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या.

अध्यक्ष सचिव खजिनदार